Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL






Volume - X, Issue - I,
January - March - 2021
Marathi Part - I

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com


# AJANTA




Ajanta Prakashan

VOLUME - X, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2021
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

# ७ CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | जगद्गुरु संत सेवालाल महाराज - एक समाजसुधारक<br>**डॉ. बालासाहेब शिवाजी पवार** | १-४ |
| २ | तथागत बुद्ध व संत साहित्य सहसंबंध<br>**प्रा. बनसोडे जी. एस.** | ५-११ |
| ३ | भक्तीसंप्रदायाचा तौलनिक अभ्यास : वारकरी संप्रदायाच्या अनुषंगाने<br>**डॉ. भरत भिमराव जाधव** | १२-१८ |
| ४ | संत तुकारामांच्या अभंगातील विठ्ठल भक्ती<br>**प्रा. डॉ. दिलीप रामचंद्र जाधव** | १९-२१ |
| ५ | महाराष्ट्रातील वारकरी परपंरितील स्त्री संत बहिणाबाई<br>**डॉ. धनंजय नागोराव मोगले.** | २२-२५ |
| ६ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या साहित्यातील मानवतावादी विचार<br>**प्रा. डॉ. हिरालाल सोमा पाटील** | २६-३० |
| ७ | संत साहित्यातील जीवन मूल्य<br>**प्रा. डॉ. काळे. बी. एम.** | ३१-३५ |
| ८ | संत एकनाथ आणि पर्यावरण<br>**प्रा. डॉ. म. ई. तंगावार** | ३६-३९ |
| ९ | संत तुकारामांच्या अभंगातील विद्रोही भावनेचा अनुबंध<br>**प्रा. मधुकर रामचंद्र काळबागे**<br>**प्रा. सुखदेव विष्णू कोल्हे** | ४०-४३ |
| १० | संत चळवळ आणि समाजक्रांती<br>**प्रा. महेश स्वा. तानवडे**<br>**प्रा. सविता मल्लाडे** | ४४-४७ |
| ११ | संत तुकाराम यांच्या साहित्यातील विद्रोही विचार<br>**प्रा. डॉ. मारोती बालासाहेब भोसले** | ४८-५२ |

# ७. संत साहित्यातील जीवन मूल्य

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

प्रा. डॉ. काळे. बी. एम.
मराठी विभाग प्रमुख कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय सोनपेठ.

महाराष्ट्रात मध्ययुगात निर्माण झालेले संत साहित्य हे एका जोरकस चळवळीतून निर्माण झालेले साहित्य आहे. मध्ययुगाच्या संदर्भात संतांचे कार्य मैलिक आहे. संत नामदेव यांनी "पांडुरंगाला" महा समन्वयक मानून अठरापगड जातीच्या लोकांना एकत्र केले. संत बहिणाबाईंनी भागवत मंदिराचे चित्र रेखाटताना "ज्ञानदेवे रचिला पाया" असे व कर्तृत्व ज्ञानेश्वरांना दिले असले तरी खऱ्या अर्थाने "वारकरी संप्रदाय" सर्वसामान्यां पर्यंत पोहोचविण्यात संत नामदेवांचे कार्य फार मोठे आहे. संत साहित्याच्या इतिहासात त्याला तोड नाही यासंदर्भात डॉ.अ.ना. देशपांडे म्हणतात "भागवत संप्रदायातील नामदेवांचे कार्य तर ज्ञानेश्वरापेक्षाही मोठे व मोलाचे आहे. परधर्मसहिष्णूता आणि सर्वसमावेशकता, यामुळे तर त्यांचा विस्तार व लोकप्रियता खूपच वाढली" आपल्या ऐंशी वर्षाच्या आयुष्यात त्यांनी अभंगाच्या आणि कर्तृत्वाच्याद्वारे समाजाला मानवता भूतदया, शांती, सवीर्भूती प्रेमभाव, संतमहात्म्यातुन आदर्श व्यक्ती आणि भक्ते यांची मुल्ये शिकवली. त्यामुळे उच्चनीच भक्त एकत्र आले. अठरापगड जातींना मनवतेने भारावुन त्यांनी जातीनिरपेक्ष असा विचारांची मुहूर्तमेढ रोवली संत नामदेवांचा हा वसा पुढे अनेक संतांनी चालवला. संत चोखामेळा, संत कर्ममेळा, संत सेना न्हावी, संत सावता माळी, संत नरहरी सोनार, संत विसोबा खेचर, संत गोरा कुंभार, परिसा भागवत, संत जनाबाई, संत कान्होपात्रा, संत एकनाथ, संत तुकाराम, संत निळोबा, संत महीपती, संत बहिणाबाई यांनी अध्यात्माच्या प्रांतात लोकशाही निर्माण करण्याचा प्रयत्न केला. विठ्ठलभक्तीची संधी सर्वांना उपलब्ध करून दिली. स्त्रिया आणि शूद्र यांना सुद्धा भक्तीचा अधिकार प्राप्त करून दिला. भक्ती साधनेसाठी संसार त्यागाची आवश्यकता नाही. हे त्यांनी ठासून सांगितले लोकभाषेत त्यांनी तत्वज्ञान सांगितले.

मध्ययुगाच्या संदर्भात संताचे कार्य मौलिक असल्याचा प्रत्यय संतांच्या साहित्यातून येतो. आज सातशे वर्षाचा कालावधी लोटल्या नंतरही संत साहित्यातील सर्वसामान्य माणसांची रुची काही कमी झालेली आपल्याला आढळून येत नाही. त्यांचे सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे संत साहित्यात असलेली जीवनमूल्य. त्यांच्या साहित्याचा केंद्रस्थानी सामान्य माणूस आहे. माणसाचे हित हेच त्यांच्या लेखनाचे सूत्र आहे. मानवी हिताच्या आड येणाऱ्या गोष्टीवर त्यांनी कठोर हल्ले चढवले. माणसाचे होणारे शोषण, त्यावर त्यांनी आपल्या लेखणीद्वारे आसूड ओढले. "बुडती हे जन न देखवे डोळा। म्हणून येतो कळवळा"। या कळवळ्या पोटी त्यांनी कोणत्याही गोष्टीची भीती न बाळगता बेडरपणे विचार मांडले. जात,

Late Ramesh Warpudkar A.C.C. Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

धर्म, पंथ, गोत्र, कुळ, लिंग, वर्ण यांच्या आडुन होणाऱ्या शोषणाविरुद्ध त्यांनी आवाज उठवला यज्ञ, याग, होम, हवन, जप-तप यांसारख्या वृकवैकतल्यातील फोलपणा त्यांनी समाजासमोर मांडला. त्यांनी जनात जनार्धन शोधला.

जे का रंजले गांजले ।तयासी म्हणे जो आपुले।
तोचि साधू ओळखावा। देव तेथेची जाणावा।

रंजल्या, गांजलेल्या, पिचलेल्या माणसांची जो सेवा करतो तोच संत नव्हे तोच देव हे त्यांनी ठणकावून सांगितले.

तिर्थी धोंडा पाणी।
बाबा विदेव शेकडा सजनी।

पदरात पुण्य गाठीला बांधण्यासाठी आजही लाखो लोक तीर्थस्थानाला जातात. प्रत्येक तीर्थस्थानाला दगड आणि पाणी आहे. तुम्ही ज्याचा शोध घेतांना तो सज्जन माणसाच्या ह्दयात असल्याचे त्यांनी सांगितले. आज आपण पाहतो "कोरोना" महामारीच्या पार्श्वभूमीवर गेली नऊ महिने मंदिर, मज्जिद, चर्च, गुरुद्वारे बंद होती देव कडीकुलपात बंद होता देवाचे संरक्षण माणसाला करावे लागले. कोणताही देव कोरोना महामारीच्या नायनाट करण्यासाठी पुढे आला नाही. सोनू सूद, रतन टाटा सारखी देव माणसे पुढे आली. धर्माच्या आडुन माणसचे होणारे शोषण संतांनी ओळखलं होत.पाप-पुण्य, स्वर्ग-नरक या माणसाच्या कल्पना आहेत. संत तुकोबांनी पाप पुण्या संकल्पनेचा लावलेला अर्थ शुद्ध मानवतावादी आहे. ते म्हणतात "परोपकारते पुण्य। परपीडा ते पाप"

संतांनी 'समतेला' महत्त्व दिले. मध्ययुगीन काळात 'विटाळ' सारखी खुळचट कल्पना होती. माणसांचा माणसांना विटाळ होत होता. आणि हे सर्व करत होते उच्चवर्णीय. त्यांचा समाचार घेताना संत तुकोबा म्हणतात.

महारासी शिवे कोपे। ब्राह्मण तो नव्हे।
तया प्रायश्चित काही। देहत्याग करिता नाही।

विशिष्ट जातीच्या लोकांचा स्पर्श झाला की जो विटाळ मानतो अशा माणसाला देहत्यागाची शिक्षा दिली तरी कमी आहे. असे तुकाराम बेडरपणे सांगतात. भेदाभेद याविषयी ते लिहितात

विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म।
भेदाभेद भ्रम अमंगळ।
ऐका जी तुम्ही भक्त भागवत।
कराल ते हित सत्य करा।
कोणाही जीवाचा न घडो मत्सर।
वर्म सर्वेश्वर पूजनाचे।

संत विचाराचे सार या अभंगात आहे. कोणत्याही गोष्टीवरुन माणसामाणसात भेद करू नका. कुळ, जात, वर्ण, गोत्र, हे सगळे थोतांड आहे. कपोलकल्पित आहे. कोणत्याही माणसाचा द्वेष न करणे म्हणजे निर्मिकाचे पूजन आहे. एवढा जीवनवादी विचार संतांनी सोप्या भाषेत सांगितला.

संतांनी मानवी जीवनात 'संयमा' ला खूप महत्त्व दिले. संयमी माणस जीवनात यशस्वी होतात. त्यामुळे माणसाने उताविळ होण्यापेक्षा संयमी राहिले पाहिजे हे सांगताना

महापुरे झाडे जाती ।
तेथे लव्हाळे राहती ।

गंगेला जर महापूर आला तर मोठी मोठी झाडे उन्मळुन पडतात कारण ते झुकत नाहीत पण लव्हाळा हे गवत लवचिक असल्यामुळे ते वाकते. पाणी ओसरून गेल्यावर पुन्हा ताठ मानेने उभे राहते. तसेच माणसाचे जीवन जगताना नम्रतेने जगले पाहिजे संकटात धीराने सामोरे जाणे गरजेचे आहे. आपले चित्त भंग न पाहता एकाग्रतेने सामोरे गेले पाहिजे हे सांगताना संत तुकाराम म्हणतात

गेली वीरसरी। मंग त्यासी रांड मारी।
मग नये तेसी सत्ता। गेली मागिल आणिता।
मंगलिया चित्ता। न ये कसावे संधिता।
तुका म्हणे धीर। मंगलिया पाठी कीर।

पुरुषामधलं पुरुषत्व संपलं की त्याची बायको त्याचा समाचार घेते. पूर्वी सारखा अधिकार गाजवायचा त्यांन प्रयत्न केला तर त्याला तसा अधिकार गाजवायला येत नाही. तस चित्त भंग न पावू देता एकाग्रपणे येणाऱ्या समस्येला सामोरे गेले पाहिजे हे ते सांगतात. त्या काळातले धर्मगुरू, धर्मठक सामान्य माणसाचे शोषण करत त्यांच्या समाचार घेताना संत तुकाराम म्हणतात

जेवतांही धरी। नाक हागता परी।
ऐशियाचा करी चाळा। आपुलीची अवकळा।
सांडावे मांडावे। काय ऐसे नाही ठावे।
तुका म्हणे करी। ताक दुधा एक सरी।

असे काही लोक असतात की, ज्यांच्या वर्तनातून स्वतःची अवकळा दाखवत असतात. जेवतांना आणि हागतांना देखील नाक धरतो, काय बोलावे कसे मांडावे, काय सोडून दयावे हे देखील त्याला कळत नाही. आपल्या पाल्याला कसे घडवावे, त्यांच्याकडे किती लक्ष द्यावे हे सांगताना संत तुकाराम म्हणतात

मढे झुकुनीया करिता पेरणी।

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

ऐसी कुणबियाची वाणी लवलाहे।

तयापरी करी स्वाहित आपले।

जयासी पावले नरदेह।

ज्याप्रमाणे शेतकरी पेरणीला अत्यंत महत्त्व देतो. दारावर प्रेत (मढे)जरी असले तरी त्याला बाजूला सारून तो पेरणी करण्यासाठी जातो तेवढ तत्पर आपण आपल्या लेकरराविषयी सजग असण गरजेचे आहे. त्यामुळे ते म्हणतात

"आपुलिया हिता जो होय जागता। धन्य माता पिता तयाचिया"। आपल्या हितासाठी आपण जागरूक असण गरजेचे आहे हे ते सांगतात.

संतांनी "सत्य" हे सर्वश्रेष्ठ मूल्य मानले. "सत्य तो चि धर्म असत्य ते कर्म। आणिक हे वर्म नाही दुजे। असे ते सांगतात."

जोडोनिया धन उत्तम वेव्हांरे।

उदास विचारे वेच करी।

उत्तमची गती तो वेचे पावेल।

उत्तम भोगील जीव खाणी।

परोपकारी नेणे परनिंदा।

परस्त्रिाया सदा बहिणी माया।

भूतदया गाई पशूंचे पालन।

तान्हेल्या जीवन वनामाजी।

आज आपण पाहतो की माणस पैशाच्या पाठीमागे लागली आहेत. वाम मार्गाने कमवीत आहेत. जस ओरबडता येईल तस ओरबाडून सामान्य जनांना लुटत आहेत. संतांच्या काळातही हे होत. पोट भरण्यासाठी त्यांनी "किर्तना" चा उपयोग केला. त्यांना सज्जड दम देताना संत तुकाराम म्हणतात.

जेथे किर्तन करावे ।तेथे अन्न न सेवावे।

बुका लावू नये भाळा। माळ घालू नये गळा।

तटावृषभासी दाणा। तृण मागो नये जाणा।

तुका म्हणे द्रव्य घेती ।देती तेही नरका जाती।

जेथे किर्तन करावे त्या ठिकाणी अन्नसुद्धा खाऊ नये,नव्हे कपाळाला बुका, गळ्यात माळ घालू नये, ज्वारी मागू नये, बैलासाठी गवत मागू नये. आणि जे देतात आणिजे घेतात दोघेही नरकात जातात असे त्यांनी म्हटले आहे.

थोडक्यात संत साहित्यात पानोपानी मानवी मूल्य ओतप्रोत भरलेली आहेत. जीवनाच तत्त्वज्ञान संतानी अतिशय सोप्या भाषेत मांडले. एखादा कथाकार, कादंबरीकार कादंबरीतून जे मांडतो ते संतांनी अभंगाच्या एका चरणात मांडले आहे. संतांनी जगताना आलेले अनुभव संत साहित्यातून मांडले आहे. संत तुकाराम तर "म्हणतात, "आलिया अनुभवा। ते जगा देतसे" ।केवळ वारकऱ्यांनाच नव्हे. तर साऱ्या समाजाला संतांनी नीतिमूल्यांची आठवण करून दिली. "दया तिचे नाव भूतांचे पाळण आणिक निर्दाळण कंटकाचे" अशा दुधारी त्यांनी आपल्या लेखनीचा वापर केला.

संदर्भ ग्रंथ

1. प्राचीन मराठी वाङःमयाचा विवेचक इतिहास - प्र.न.जोशी.
2. प्राचीन मराठी वाङःमयाचा इतिहास - अ.ना.देशपांडे.
3. प्राचीन मराठी वाङःमयाचा इतिहास - ल.रा.नसिराबादकर.
4. संत वाङ्:मयाची समाजिक फळश्रुती - गं.बा.सरदार.
5. पाच संतकवी - रा.गो.तुळपुळे.
6. संत तुकाराम चरित्र - ल.रा.पांगारकर.

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani